# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अकोला इथं जाहीर सभा झाली. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा आयोजित करण्यात आली. यावेळी जनतेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात मोठ्या खर्चाचे विकास प्रकल्प राबवले जात असल्याचं सांगितलं. आगामी पाच वर्षांतील विकासकामांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. राज्यात होत असलेल्या देशातील सर्वात मोठ्या वाढवण बंदराच्या विकासकामाचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांची नांदेड इथंही जाहीर सभा होणार आहे. नांदेडमध्ये खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीत आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा होणार आहे.

****

झारखंडमध्ये एकीकडे विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असतानाच मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे निकटवर्तीय सुनील श्रीवास्तव यांच्या घरावर आयकर विभागाने छापे टाकले आहे. श्रीवास्तव यांच्याशी संबंधित रांची आणि जमशेदपूरमधील नऊ वेगवेगळ्या ठिकाणी तपास सुरू आहे.

****

मुख्य निवडणुक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणुक प्रचारादरम्यान महिला नेत्यांवर केल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह वक्तव्यांचा तीव्र निषेध केला आहे. महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या नेत्यांवर, आचारसंहितेअंतर्गत अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करवी, असे निर्देश त्यांनी दिल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं मतदारांसह उमेदवारांसाठी सी-व्हिजिल, सुविधा, मतदार मदतकेंद्र, केवायसी हे मोबाईल ॲप आणि १९५० हा मोफत दुरध्वनी मदत क्रमांक आदी माहिति तंत्रज्ञान सेवा उपलब्ध केल्या आहेत. मतदारांना आपल्या मतदार यादीतील नावांची माहिती व्होटर हेल्पलाईन ॲपद्वारे समजणार आहे. तर सी-व्हिजिल हे ॲप आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी उपयोगी आहे. मतदारांना त्यांच्या मतदारसंघातील उमेदवारांवर दाखल गुन्ह्यांचा तपशील, उमेदवारांची माहिती, केवायसी ॲपद्वारे पाहता येणार आहे.

****

जळगाव जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार जनजागृती उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, महानगरपालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्या हस्ते या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी सर्व अधिकारी आणि सर्व विभाग प्रमुख, सर्व शाखा अभियंत्यांसह कर्मचारी यांनी सामूहिक शपथ घेतली, तसंच पथनाट्याद्वारे शंभर टक्के मतदान व्हावं, यासाठी जनजागृतीपर संदेश देण्यात आला.

****

राज्य विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं स्वीप उपक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी `उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा` हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. मुंबईतल्या घाटकोपर रेल्वे स्थानकाबाहेर आज पथनाट्य सादर करुन विशेष मतदार जनजागृती करण्यात आली. यामध्ये नागरिकांना मतदान प्रक्रियेतील महत्त्व आणि त्यांचा सहभाग वाढवण्याबाबत आवाहन करण्यात आलं.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

सध्याच्या विधानसभा निवडणूक प्रचार कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत परराज्यातील दारू आणि चार वाहनांसह ४० लाख, ६४ हजार, ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या विभागानं गेल्या एक

ऑक्टोबर  पासून आजपर्यंत एकूण ३१ गुन्हे नोंद करून ३१ संशयीत आरोपींना अटक केली आहे.

****

दरम्यान, हिंगोली जिल्ह्यात आखाडा बाळापूर इथं अवैध तंबाखू विक्रेत्यांवर कार्यवाही करुन सात जणांवर गुन्हा नोंदवण्यासह तीन हजार चारशे रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. तंबाखू विरोधी कायद्यानुसार, शासनाच्या आरोग्य विभागातर्फे ही धडक कारवाई करण्यात आली.

****

केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यात मूग, उडीद, सोयाबीन खरेदी सुरु करण्यात आली आहे. सध्याच्या चालू खरीप हंगामातल्या या धान्यांची राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ- एन.सी.सी.एफ.तर्फे ही खरेदी करण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यात विविध खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. तिथं शेतकऱ्यांसाठी नोंदणीचीही सुविधा सुरु करण्यात आली आहे. वारंगा फाटा, कळमनुरी, येहळेगाव, बळसोंड, जवळा बाजार, कन्हेरगाव, साखरा, सेनगाव, वसमत आणि शिवणी खुर्द इथं ही केंद्र असल्याचं जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

****

अदिलाबाद-नांदेड इंटरसीटी एक्सप्रेस आजच्या दिवसासाठी मुदखेड ते नांदेडदरम्यान अंशत: रद्द करण्यात आली. सुधारीत वेळेनुसार ही गाडी आज सकाळी आठऐवजी दहा वाजता आदिलाबादहून निघाली आहे.

****

भारताच्या पंकज अडवाणीनं कतारच्या दोहा इथं सुरू असलेल्या जागतिक बिलियड्र्स स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. काल उपांत्य फेरीत त्यानं भारताच्या सौरव कोठारीचा चार विरुद्ध दोन असा पराभव केला. सौरव याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागलं तर २७ वेळेचा विश्वविजेता पंकज अडवाणी अंतिम फेरीत इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलशी भिडणार आहे.

****